# ज्ञात-अज्ञात - भाग ४

आम्ही रियाच्या रूमवर पोचलो. तिची रूममेटही आमची वाटच पहात होती. तिने सगळ्यांसाठी छानशी कॉफी बनवली. माझी बेचैनी लपवण्यासाठी मी म्हटलं, ``मी वॉश घेऊन येते. तुम्ही गप्पा मारत बसा." ``आन्टी, सॉरी ममा... मी पण निघतोय आता. तुम्ही रेस्ट घ्या. उद्या-परवा फोन करून मी येईन पुन्हा." असं म्हणून रॅनही निघाला. मी बाथरूममध्ये बाथटबमधे शॉवरखाली बसले. आणि आतापर्यंत एअरपोर्टवरून इथे पोचेपर्यंतच्या भावनांना शॉवरच्या धारेखाली वाट करून दिली.

झोपेचं - जेटलॅगचं कारण पुढे करत मी मुलींशी आणखी बोलत बसणं टाळलं. बेडवर पडून झोप लागल्याचं नाटक करत मी हा तिढा कसा सोडवावा ह्या विचारात गढले.

दुसऱ्या दिवशी रॅन पुन्हा मला भेटायला म्हणून आला आणि मग एक दिवसाआड रियाला आणि मला भेटायला तो येतच राहिला. तो आला की मला बोलणं सुधरायचंच नाही. मी किचनमध्ये जेवण करायला म्हणून जायचे. पण रियाच्या आग्रहास्तव तो माझ्या हातचं काहीतरी खाऊन जाण्यासाठी थांबे आणि मला लक्षात आलं. मी केलेलं पिठलं, खिचडी कढी, थालिपीठ ह्या गोष्टी त्यालाही खूपच आवडल्या. ह्याच्याही आवडी-निवडी किती निनादसारख्याच आहेत. एवढंच कशाला, त्याची बोलण्याची ढब, जीन्सच्या दोन्ही खिशात हात घालून उभं राहाण्याची स्टाईल, मधेच केसातून हात फिरवणं सगळं काही निनादसारखंच. दर दिवसागणिक मी अधिकाधिक बेचैन होत होते. शनिवार-रविवारी मला घेऊन कुठेतरी आऊटींगला जायचा प्लॅन त्यांनी केला. मी गुंता सोडवू पहात होते, तर तो सुटत नव्हता आणि मी फक्त अस्वस्थ होऊन पहाण्याशिवाय काही करू शकत नव्हते.

शेवटी न राहवून आठवड्याभरानंतर मी ह्यांना फोन केला. तुम्ही इकडे लवकर या म्हणून ह्यांना गळ घातली. माझं अस्वस्थपण फोनवरच्या माझ्या आवाजातूनही ह्यांना जाणवलं असावं. रजा ॲडजस्ट करून, तिकीट प्रीपोन करून हे जेवढ्या लवकर तिकडे येता येईल तसं येतो म्हणाले. तेव्हा मला बरंच आश्वस्त वाटलं.

हे येणार असल्यामुळे रियाची रूमपार्टनर दुसऱ्याया एका मैत्रिणीच्या रूमवर दोन महिन्यांसाठी रहायला गेली होती. त्यामुळे रिया आणि आम्ही दोघं तिच्या रूमवर नि:संकोच राहू शकणार होतो. हे आले आणि बाप-लेक दोन वर्षांनंतर एकमेकांना भेटले. साहजिकच दोन वर्षांतलं सगळं रिया तिच्या

लाडक्या बाबाशी भरभरून बोलत होती. विशेषत: विंटरमध्ये टेंपरेचर मायनसमध्ये जातं तेव्हा काय हालत होते ते सर्व ती सांगत होती. हे ही कौतुकाने सगळं ऐकत होते. मात्र रॅनचा विषय - त्याच्याबद्दल बोलणं रियाने कटाक्षाने टाळलं. ती जबाबदारी तिने माझ्यावर सोपवली होती.

माझी अस्वस्थता वाढत होती. चहा, नाश्ता, गप्पा मग जेवण. मला ह्यांच्याशी काहीतरी खास बोलायचंय हे ह्यांना जाणवलं होतं. आज लवकर झोपूया म्हणत ह्यांनी झोपायची तयारी सुरू केली. दुसऱ्या दिवशी रिया कॉलेजला गेल्यावर मी ह्यांच्याशी रॅनबद्दल बोलायचं ठरवलं. तिथे आल्यापासून पहिल्यांदाच मला त्या रात्री शांत झोप लागली.

सकाळी जाग आली तर बरंच फ्रेश वाटत होतं. रिया कॉलेजला गेली. आम्ही आमची आन्हिकं आटोपली. नाश्त्याच्या प्लेट्स आणि चहा-कॉफीचे मग घेऊन टेबलपाशी बसलो. माझा हात हातात घेत हे म्हणाले, ``बोला राणी सरकार, माझ्या शिवाय दहा दिवस सुद्धा कठीण गेले ना?'' ह्यांच्या प्रेमाने भारावलेल्या मी रिया-रॅनबद्दल सांगण्यासाठी मनात शब्दांची जुळवाजुळव करत होते. त्या दोघांचं नातं लक्षात घेता हे सर्व ह्यांना कसं सांगावं मला कळत नव्हतं.

शेवटी एकदाचा मी विषयाला हात घातलाच. मोठ्या कष्टाने शब्द जुळवत मी ह्यांना म्हणाले, ``आपली रिया एका मुलाच्या प्रेमात पडलीय. दोघं लग्न करणार आहेत.'' ``ओह! ग्रेट गुड न्यूज. चला, जावई शोध करण्यासाठी आपल्याला जोडे झिजवायला नकोत. लेकीने काम सोप्पं केलं आपलं.'' माझा मूड खुलवायला हे म्हणाले. पण सगळी मेख पुढेच होती. ``तसं नाही. ऐका ना. रियाला आपल्याला समजवायला हवं. तिने रॅनशी लग्न करणं बरोबर नाही.'' ``का बरं? अग, जग इतकं पुढे गेलंय. आता जाती-पातीचं काय घेऊन बसलीस?'' ``तसं नव्हे हो. हा रॅन - रियाचा मित्र म्हणजे दुसरा तिसरा कुणी नाही. तो रोहन आहे. रोहन - माझा आणि निनादचा मुलगा...'' माझ्या डोळ्यातून अखंड वाहू लागलेल्या गंगा-यमुनांना बांध घालणं मला शक्य होत नव्हतं. पुढे काय आणि कसं बोलावं मला कळत नव्हतं. नियतीच्या ह्या खेळापुढे मी हतबल ठरले होते. पूर्ण हरले होते.

``हे सगळं माझ्याच बाबतीत का घडावं? कुठल्या जन्मीची शिक्षा देव मला देतोय? खरं तर देव आहे तरी का? मी कसा विश्वास ठेवायचा देवावर? हे माझं प्राक्तन म्हणू की नियतीची थट्टा म्हणू?'' मी काहीही असंबद्ध बोलत सुटले होते.

माझा हात हातात घेत हे म्हणाले, ``शांत हो. मी सांगतोय ते शांतपणे सर्व ऐक." माझा हात तसाच हातात घट्ट धरून हे पुढे सांगू लागले, ``जगात देव आहे. नक्कीच आहे. आस्तिक-नास्तिक सीमारेषेच्या पलिकडे. ज्याला आपण नियती म्हणतो ती म्हणजे काही वेगळं नाही." त्या क्षणी तरी मला ह्यांचा तो उपदेश निरर्थक वाटत होता. डोळ्यासमोर भली थोरली प्रश्नचिन्हं तयार होऊन ती माझ्या अंगावर येऊन आदळत होती. त्याचबरोबर ह्यांचे पुढचे शब्दही माझ्या कानावर आदळत माझ्या मनात शिरत होते. हे सांगत होते -``तुझी डिलिव्हरी झाली त्यावेळी बाळाच्या मानेभोवती नाळ गुंडाळली गेली होती आणि आपली मुलगी तुझ्या पोटातच गेली. शेवटच्या क्षणी डॉक्टरांनी सिझर करून तिला बाहेर काढलं. तू शुद्धीत नव्हतीस. शुद्धीत आल्यावर तुला हे कळलं तर हा दुसरा मानसिक धक्का तू पचवू शकली नसतीस. काय करावं ह्या संभ्रमात डॉक्टर, मी, तुझा दादा आम्ही होतो. तुझी कंडिशन अतिशय क्रिटिकल होती. डिलिव्हरीच्या वेळच्या कॉम्प्लिकेशन्समुळे यापुढे तुला कधीही मूल होणं शक्य नसल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. तुझ्या जीवाला धोका होता."

हे सांगत असताना ह्यांच्याही डोळ्यात पाणी तरारलं. हे पुढे म्हणाले, ``आणि नियती तरी कशी बघ, आम्ही सुन्नावस्थेत होतो तेवढ्यात सिस्टरने येऊन डॉक्टरांना सांगितलं, नुकतीच दोन तासांपूर्वी डिलिव्हरी होऊन मुलगी झालेली एक पेशंट गेली. तुझ्या आधी थोड्यावेळापूर्वी त्याच हॉस्पिटलमध्ये एका गरीब विधवा बाईची डिलिव्हरी झाली होती. काही महिन्यांपूर्वी रेल्वे अपघातात तिचा नवरा गेला होता. तिला नात्याचं कुणीच नव्हतं. बाप आधीच गेला आणि आता बाळाला या जगात एकटं सोडून ती बाईही गेली. त्या छोटुलीला कुणीच नव्हतं. त्या अनाथ बाळाला अनाथाश्रमात पोचवण्याच्या दृष्टीने डॉक्टर सिस्टरला सूचना देत होते. इकडे तुझी अवस्थाही बिकट होती. कदाचित बाळाच्यामुळे तुला पान्हा फुटेल आणि तू सावरशील असंही डॉक्टर म्हणाले होते. सगळंच अनसर्टन होतं. त्यावेळी मी आणि तुझ्या दादाने डॉक्टरांच्या संमतीने ती अनाथ मुलगी तुझी म्हणून तुझ्या कुशीत दिली. तू शुद्धीवर आलीस तेव्हा त्या चिमुकलीला कुशीत पाहून आनंदलीस. तृप्त झालीस. तुला पान्हा फुटला. तू तिचे मुके घेत सुटलीस. डॉक्टर, मी, तुझा दादा, हॉस्पिटलमधली ती सिस्टर आम्ही सगळेच गलबललो. आमचा डिसिजन योग्यच होता. मात्र तुझी केस हिस्ट्री पहाता हे सर्व तुला लगेच न सांगता वेळ आली की सांगायचं असं आम्ही ठरवलं. एकदा-दोनदा तुला हे सांगावं ह्या विचाराने तुझ्या दादाशी मी बोललो देखील. विशेषत: रिया तीन महिन्याची असताना एक दिवस तुझं अचानकच खूप डोकं दुखलं होतं. आणि त्यानंतर तुझ्या सर्व टेस्ट केल्या होत्या. त्या सर्व नॉर्मल असल्याचा रिपोर्ट आल्यानंतर आता तुला काही दिवसांनी सर्व सांगावं असं मला वाटतं होतं.'

आईच्या पोटात असताना वडिलांचं आणि डोळेदेखील उघडायच्या आधी आईचं छत्र हरवलेली अनाथ रिया. रियाला अनाथ, पोरकी म्हणण्याचा आणि तुला हे सर्व सांगण्याचा मलाच धीर झाला नाही. मी माझ्या मनाला लगाम घातला आणि दोऱ्या माझ्यापाशीच ठेवल्या."

आमचे दोघांचेही डबडबलेले डोळे आता वहात होते. ``पण नियतीचा संकेत बघ." हे पुढे म्हणाले,``तुझ्या सहवासाविना वाढलेल्या तुझ्या सख्ख्या मुलाचं लग्न तू स्वत: जिला तुझ्या पूर्ण सहवासात वाढवलंस, लहानाचं मोठं केलस त्या अनाथ मुलीशी करून देण्याचं भाग्य नियती आज तुला देतेय. नियतीच्या ह्या सगळ्या खेळापासून पूर्ण अनभिज्ञ असलेल्या त्या दोन गोड पिलांना ह्यातलं काहीही कळू द्यायचं नाहीये. त्यांना मायेचा उबारा आपण द्यायचाय. पटतंय का मी काय सांगतोय ते..."

ह्यांचं बोलणं मनावर कोरलं जात असतानाच मी हळूहळू स्वतला सावरलं होतं. नियतीच्या डावात फासे कधी कसे पडतील कुणीच सांगू शकत नाही. कधी उलट, कधी सुलट. आपण फक्त पहात रहायचं. कधी डाव आपल्या बाजूने पडेल त्याची प्रतीक्षा करत राहायचं... आज माझ्या बाजूने फासे पाडून नियतीने मला स्तिमित केलं होतं, नि:शब्द केलं होतं. अभिमन्यूप्रमाणे चक्रव्यूहात शिरलेल्या मला आत शिरण्याची वाट माहीत होती आणि आज त्या चक्रव्यूहाचा भेद करण्याचा मार्गही मला नियतीनेच दाखवला होता...!

भूतकाळाच्या आठवणींच्या शिंपल्यातून एक एक टपोरा मोती काढून ह्यांनी माझ्यापुढे ठेवला होता आणि हरखून जाणं म्हणजे काय याचा अनुभव मी घेत होते. मनाच्या प्रतिसादाची वेस ओलांडून हा गुंतागुंतीचा तिढा सुटला होता. शेवटी, कोणती पुण्याई ये फळाला असं वाटून, सर्व ज्ञात झालेल्या मी अज्ञाताच्या वाटेने जायचं ठरवलं. माझ्याच बछड्यांच्या सुखासाठी!

(समाप्त)

**लीना माटे**